# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या तातडीच्या १६० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## सोमवार, दि. २४ जुलै, २०२३ दुपारी ०४:३० वा.

NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)



प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची तातडीची १६० वी बैठक **सोमवार, दि. २४ जुलै, २०२३ रोजी दुपारी ०४:३० वा.** व्यवस्थापन परिषद सभागृहात मा. प्रभारी कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस सदस्य हे उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) राजनीश कामत, प्रभारी कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) गौतम सुबण्णा कांबळे, प्र-कुलगुरु | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ६) | प्रा. (डॉ.) बाळकृष्ण जगन्नाथ लोखंडे | सदस्य | उपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार | सदस्य | उपस्थित |
| ८) | प्राचार्य डॉ. भिमाशंकर मुर्गप्पा भांजे | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| १०) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ११) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| १२) | श्री. महादेव दऱ्याप्पा कमळे | सदस्या | उपस्थित |
| १३) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १४) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १६) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १७) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | उपस्थित |
| १८) | डॉ. उमेश काकडे, विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), सोलापूर (मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्य | उपस्थित |
| १९) | मा. संचालक (तंत्रशिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| २०) | सीए श्रेणिक हुकुमचंद शाह, वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | डॉ. शिवकुमार सुगण्णा गणपूर<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २२) | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

दि.२६/०६/२०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये मंजुरी झाल्याप्रमाणे विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सभागृहाचे **"राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृह"** असे नामकरण करण्यात आले.

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

**श्रध्दांजली:**

रायगड जिल्ह्यातील खालापूरनजीक असलेल्या इर्शाळवाडी येथे बुधवार, दि. १९ जुलै, २०२३ रोजी अतिवृष्टीमुळे दरड कोळसून मोठी दुर्घटना झाली असून सदर दुर्घटनेमध्ये मृत्यूमुखी पडलेल्या लोकांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात आली.

**अभिनंदन:**

N+२ आणि Redegree संदर्भात मा. प्र-कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखालील समितीने कायदेशीर बाबींवर विस्तृत चर्चा करुन अहवाल तयार केल्याबद्दल मा. प्र-कुलगुरु व समिती सदस्यांचे व्यवस्थापन परिषदेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०१ ] | दि. १० जुलै, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १५९ व्या तातडीच्या बैठकीचा कार्यवृत्तांताची नोंद घेण्याची बाब विचारार्थ.<br>कुलसचिव यांनी दि.१० जुलै, २०२३ रोजी झालेल्या तातडीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून दाखविला असता, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | दि. १० जुलै, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १५८ व्या तातडीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत सर्वानुमते कायम करण्यात आला. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ ०२ ] | **Quick Heal Foundation (QHF), पुणे व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्याकडून प्राप्त झालेल्या सामंजस्य कराराबाबतची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून Eern and Learn या उपक्रमाअंतर्गत संकुलातील १०० विद्यार्थ्यांनी ४६२ शाळा व महाविद्यालयात ७८० सेमिनारद्वारे १,५७,१६५ विद्यार्थ्यांना Cyber Security या विषयावर व्याख्यान दिले. या मोबदल्यात QHF कडून संकुलातील १०० विद्यार्थ्यांना ₹८,६१,१००/- इतके मानधन मिळाले आहेत.<br>शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी अशाच प्रकारचा सामंजस्य करार करण्याबाबत QHF कडून दि.११/०७/२०२३ रोजी ई-मेलद्वारे सामंजस्य कराराचा मसुदा प्राप्त झाला आहे. सदर मसुदा कायदा विभागाकडून दि.१५/०७/२०२३ रोजी तपासून घेण्यात आला आहे.<br>सबब, सदरच्या सामंजस्य कराराचा मसूदा व कराराच्या संबंधीची बाब विचारार्थ. | संगणकशास्त्र संकुल |
| ठराव: | **Quick Heal Foundation (QHF), पुणे व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्याकडून प्राप्त झालेल्या सामंजस्य करार करण्यास व कराराच्या मसुद्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०३ ] | **मुलींच्या वसतिगृहासाठी Generator सेट खरेदी करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठातील मुलींच्या वसतिगृहामध्ये प्रत्येक वर्षी २८० ते ३०० विद्यार्थीनींना प्रवेश दिला जात आहे. विद्यापीठ परिसरामध्ये दिवसा आणि रात्रीच्या वेळेत भारनियमन किंवा विविध तांत्रिक कारणांनी विद्युत पुरवठा खंडीत होतो. विद्युत पुरवठा रात्रीच्या वेळी खंडीत झाल्यानंतर मुलींच्या वसतिगृहामध्ये पर्यायी व्यवस्था नसल्यामुळे वसतिगृहातील विद्यार्थीनींची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. विद्यार्थीनीची गैरसोय टाळण्याकरीता मुलींच्या वसतिगृहासाठी स्वतंत्र Generator सेटची खरेदी करण्याकरीता मा. कुलगुरुमहोदयांच्या दि.१०/०४/२०२३ रोजीच्या मान्यतेने तांत्रिक समिती गठीत करुन Generator चे Technical Specification तयार करुन घेतले आहेत. तांत्रिक समितीने दिलेल्या Technical Specification नुसार Generator सेटची खरेदी करावी लागणार आहे. Generator सेटची खरेदी आणि Installation करीता अंदाजे खर्च ₹७,५०,०००/- इतका अपेक्षित आहे. सदरचा खर्च Development Budget Part-II Revised Estimate २०२२-२३ and Budet Estimate for २०२३-२४ (University Hostel २०२३-२४ ₹२२,००,०००/-) या अंदाजपत्रकीय तरतूदीतून करावा लागणार आहे.<br>सबब, वरीलप्रमाणे मुलींच्या वसतिगृहाकरीता स्वतंत्र Generator सेटची खरेदी तांत्रिक समितीने दिलेल्या Technical Specification नुसार करण्यास व त्याकरीता येणारा अंदाजे खर्च ₹७,५०,०००/- इतका Development Budget Part-II Revised Estimate २०२२-२३ and Budet Estimate for २०२३-२४ (University Hostel २०२३-२४ ₹२२,००,०००/-) या अंदाजपत्रकीय तरतूदीतून करण्याची बाब विचारार्थ. | वसतिगृह विभाग |
| ठराव: | **मुलींच्या वसतिगृहासाठी Generator सेट खरेदी करण्यासाठी तांत्रिक समितीने दिलेल्या Technical Specification नुसार खरेदी करण्यास व त्याकरीता येणारा अंदाजे खर्च ₹७,५०,०००/- इतका Development Budget Part-II Revised Estimate २०२२-२३ and Budet Estimate for २०२३-२४ (University Hostel २०२३-२४ ₹२२,००,०००/-) या अंदाजपत्रकीय तरतूदीतून करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०४ ] | **व्यवस्थापन परिषदेने दि.२३/०६/२०२३ रोजीच्या बैठकीत अ.क्र.३५(६) याबाबत पारित केलेल्या ठरावाच्या अनुषंगाने विद्यापीठ कायदा विभागाकडून वकील नेमण्याबाबतची सर्व माहिती, त्यांची नावे, मानधन, दिलेले केसेस, पॅनल व्यतिरिक्त नेमलेले वकील इ. माहिती विचारार्थ.** | कायदा विभाग |
| | टिपणी: प्रस्तुत विभागाकडे उपलब्ध असलेल्या माहितीनुसार विद्यापीठाच्या वतीने अथवा विद्यापीठ विरुध्द विविध न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या विविध न्यायालयीन प्रकरणाचा Monthly Report प्रस्तुत विभागामार्फत मा. कुलगुरु यांच्याकडे सादर करण्यात येतो. त्यानुसार माहे मे, २०२३ चा अहवाल सादर करण्यात आले असता, त्यावर मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत सदरचा अहवाल सादर करण्याबाबत शेरा दिलेला आहे. त्यानुसार माहे मे, २०२३ चा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर करण्यात आला असता, त्यावर विद्यापीठ कायदा विभागाकडून वकील नेमणेबाबतची सर्व माहिती, त्यांची नावे, मानधन, दिलेले केसेस, पॅनल व्यतिरिक्त नेमलेले वकील इ. माहिती व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करण्याबाबत ठराव पारित करण्यात आलेला आहे. प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने अथवा विरुध्द मा. सर्वोच्च न्यायालय येथे दाखल होणाऱ्या प्रकरणांची संख्या कमी प्रमाणात असल्याने विद्यापीठाच्या वतीने मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे कामकाज पाहण्यासाठी वकीलांचे पॅनल गठीत करण्यात आलेले नाही, त्यामूळे २०१८-१९ ते २०२३-२४ या कालावधीमध्ये यापूर्वी विद्यापीठाच्या वतीने काम पाहिलेले आहे. ॲड. अडसुरे यांना प्रकरणे देण्यात आलेली आहेत.<br>प्रस्तुत विद्यापीठाकडील माहितीनुसार न्यायालयीन प्रकरणांमध्ये प्रस्तुत विभागामार्फत कार्यवाही होवून नियुक्त करण्यात आलेले वकील व Legal Section या अंदाजपत्रकीय शिर्षकाअंतर्गत २०१८-१९ ते २०२३-२४ या कालावधीत प्रस्तुत विभागाकडून खर्ची टाकण्यात आलेल्या देयकासंबंधी संपूर्ण तपशील सोबत जोडण्यात आलेला आहे. तसेच प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने अथवा विरुध्द मा. सर्वोच्च न्यायालय येथे दाखल होणाऱ्या प्रकरणांची संख्या कमी प्रमाणात असल्याने विद्यापीठाच्या वतीने मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे कामकाज पाहण्यासाठी वकीलांचे पॅनल गठीत करण्यात आलेले नाही, त्यानुसार २०१८-१९ ते २०२३-२४ या कालावधीमध्ये ॲड. अडसुरे यांना नियुक्त करण्यात आलेले आहे. | |

| | | |
|---|---|---|
| | तसेच वित्त व लेखा विभागाकडून प्राप्त करुन घेण्यात आलेल्या माहितीनुसार विद्यापीठाच्या इतर विविध विभागांकडून विविध वकीलांचे देयक अदा करण्यासंबंधी कार्यवाही करण्यात येवून त्याचा खर्च Legal Section या व इतर अंदाजपत्रकीय शिर्षकाअंतर्गत खर्ची टाकण्यात आल्याचे स्पष्ट होते. त्यानुसार वकीलनिहाय देयक खर्ची टाकण्यात आल्याबाबतची माहिती व तपशील सोबत जोडण्यात आलेला आहे.<br>सबब, सदर माहिती व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव. | |
| ठराव: | व्यवस्थापन परिषदेने दि.२३/०६/२०२३ रोजीच्या बैठकीत अ.क्र.३५(६) याबाबत पारित केलेल्या ठरावाच्या अनुषंगाने विद्यापीठ कायदा विभागाकडून वकील नेमण्याबाबतची सर्व माहिती, त्यांची नावे, मानधन, दिलेले केसेस, पॅनल व्यतिरिक्त नेमलेले वकील इ. माहिती अवलोकनी घेऊन सर्वानुमते खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.<br>१. वकीलांचे पॅनल सुधारित करण्यात यावे.<br>२. पॅनल बाहेरच्या वकिलांना वकीलपत्र देण्यात येऊ नये.<br>३. सध्या पॅनल बाहेरील ज्या वकिलांना वकीलपत्र दिलेली आहेत, त्यांचे वकिलपत्र पॅनलवरील वकिलांकडे हस्तांतरित करण्यात यावे. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [०५] | **व्यवस्थापन परिषदेच्या १५७ व्या बैठकीमध्ये ठराव क्र.२(१) नुसार व्यवस्थापन परिषदेने नेमलेल्या समितीने तयार केलेला N+२ आणि Redegree संदर्भातील परीक्षा व मुल्यमापन विभागाकडे प्राप्त अर्जांवर कायदेशीर बाबींचा विचार करुन तयार केलेले अहवाल विचारार्थ.**<br>टिपणी: परीक्षा व मुल्यमापन मंडळाकडून विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या Guidelines on Determination of a Uniform span period within which a student may be allowed to qualify for a degree संदर्भातील दि. १५ आक्टोंबर, २०१५ च्या पत्रानुसार परीक्षा विभागाने प्रस्तुत विद्यापीठातील विद्यापरिषदेच्या दि. १२/०१/२०१६ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. ४८ नुसार प्रस्तुत विद्यापीठामध्ये परीक्षा व मूल्यमापन विभागाने शै. वर्ष २०२२ मध्ये करण्यात आलेल्या कार्यवाहीनुसार ज्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक वर्षांचा कालावधी N+२ नुसार पुर्ण झाला आशा विद्यार्थ्यांना परीक्षेस बसण्यास परवानगी दिली नाही. त्यास अनुसरून विद्यापीठ सल्लग्नित महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांनी परीक्षेस बसण्यास मान्यता मिळावी/संधी वाढून मिळावी याबाबत विद्यापीठाकडे अर्ज सादर केले आहेत. तसेच Redegree संदर्भात अर्ज सादर केले आहेत. या संदर्भात काय कार्यवाही करावी यासाठी दि.२४/०५/२०२३ रोजी पार पडलेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीसमोर परीक्षा विभागाकडून विषय मांडला असता व्यवस्थापन परिषदेने ठराव क्र.२(१) नुसार मा. प्र-कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली सात लोकांची समिती गठीत करण्यात आली.<br>समितीची कार्यकक्षा ही Redegree & N+२ संदर्भात परीक्षा व मुल्यमापन विभागाकडे प्राप्त अर्जांसंदर्भात समितीने कायदेशीर बाबींची पडताळणी करुन दोन्ही विषयांचे अहवाल स्वतंत्रपणे द्यावेत, संबंधीत अहवाल अधिष्ठाता मंडळ, विद्यापरिषद आणि व्यवस्थापन परिषदेसमोर विचारार्थ सादर करावेत असा ठराव करण्यात आला.<br>त्यास अनुसरुन मा. प्र-कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीच्या बैठका दिनांक १) १४/०६/२०२३ २) २१/०६/२०२३ ३) २६/०६/२०२३ ४) ५/०७/२०२३ आणि पाचवी बैठक दि.१४/०७/२०२३ रोजी घेण्यात आली. या बैठकांमध्ये समितीतील सदस्यांनी प्राप्त अर्जाविषयी कायदेशीर बाबींवर विस्तृत चर्चा करून सोबतचे अहवाल सादर केले आहेत.<br>मा.प्र-कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखालील समितीने तयार केलेले N+२ आणि Redegree संदर्भातील स्वतंत्र अहवाल दि.२४/०७/२०२३ रोजी होणाऱ्या अधिष्ठाता मंडळाच्या आणि विद्यापरिषदेच्या बैठकीसमोर सादर करण्यात आला आहे.<br>सबब, व्यवस्थापन परिषदेच्या १५७ व्या बैठकीमध्ये ठराव क्र.२(१) नुसार व्यवस्थापन परिषदेने नेमलेल्या समितीने तयार केलेले N+२ आणि Redegree संदर्भातील परीक्षा व मुल्यमापन विभागाकडे प्राप्त अर्जावर कायदेशीर बाबींचा विचार करून तयार आलेले अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | अभ्यासमंडळ विभाग |
| ठराव: | **व्यवस्थापन परिषदेच्या १५७ व्या बैठकीमध्ये ठराव क्र.२(१) नुसार व्यवस्थापन परिषदेने नेमलेल्या समितीने तयार केलेला N+२ आणि Redegree संदर्भातील परीक्षा व मुल्यमापन विभागाकडील प्राप्त अर्जांच्या अनुषंगाने कायदेशीर बाबींचा विचार करुन तयार केलेल्या अहवालाची विद्यापरिषदेने दि.२४/०७/२०२३ रोजीच्या बैठकीत बाब क्र. १९ अन्वये केलेली शिफारस स्विकारुन त्यानुसार कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[०६]</td><td>

**मा. उपसचिव, महाराष्ट्र राज्य, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्या दि.१४/०६/२०२३ रोजीच्या पत्रास अनुसरुन श्री. रविंद्र महादेव कोरे यांच्या नियमित पदावरील समायोजनेबाबत मा. व्यवस्थापन परिषदेच्या ठरावाच्या अनुषंगाने मा. कुलगुरु महोदयांनी गठीत केलेल्या समितीने दि.२०/०७/२०२३ रोजी सादर केलेला अहवाल विचारार्थ.**

टिपणी: श्री. रविंद्र महादेव कोरे यांना प्रस्तुत विद्यापीठाच्या सेवेत सामावून घेण्याबाबत मा.सं.रा.उतेकर, कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई यांना विद्यापीठ पत्र क्र.पुअहोसोविसो/आस्था/२०२३/३३५७, दि.२४/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते. त्यास अनुसरुन मा. उपसचिव, महाराष्ट्र राज्य, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्या दि.१४/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये "श्री. रविंद्र महादेव कोरे यांना नियुक्ती देण्याची बाब विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील आहे. याबाबत समकक्ष पदांची रिक्तता विचारात घेऊन तसेच विहीत कार्यपध्दती व नियमातील तरतुदींचा विचार करुन श्री. कोरे यांच्या समावेशनाबाबतच्या विनंतीच्या अनुषंगाने विद्यापीठ स्तरावर निर्णय घेण्यात यावा." असे कळविले होते.

त्यास अनुसरुन दि.२६/०६/२०२३ रोजीच्या विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत सदर विषय सादर केला असता, व्यवस्थापन परिषदेने पारित केलेल्या ठरावास अनुसरुन सदर शासन पत्रावर निर्णय घेणेकामी मा. कुलगुरु महोदयांना समिती गठीत करण्याबाबतचे सर्वाधिकार देण्याचे सर्वानुमते ठरल्यानुसार मा. कुलगुरु महोदयांनी खालीलप्रमाणे समिती गठीत केली होती.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>समिती सदस्यांचे नाव</th><th>पदनाम</th></tr>
<tr><td>१.</td><td>प्रा. देवानंद चिलवंत, व्यवस्थापन परिषद सदस्य,<br>पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर</td><td>अध्यक्ष</td></tr>
<tr><td>२.</td><td>प्राचार्य, डॉ. भिमाशंकर भांजे, व्यवस्थापन परिषद सदस्य,<br>पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>३.</td><td>प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा, अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर</td><td>सदस्य सचिव</td></tr>
</table>

उपरोक्तप्रमाणे सदर समितीची पहिली बैठक दि. १८/०७/२०२३ रोजी व दुसरी बैठक दि.२०/०७/२०२३ रोजी संपन्न झाली. सदर समितीने श्री. रविंद्र महादेव कोरे यांच्या नियमित पदावरील समायोजनेबाबत सोबत जोडल्याप्रमाणे अहवाल दि.२०/०७/२०२३ रोजी सादर केलेला आहे.

सबब, मा. उपसचिव, महाराष्ट्र राज्य, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्या दि.१४/०६/२०२३ रोजीच्या पत्रास अनुसरुन श्री. रविंद्र महादेव कोरे यांच्या नियमित पदावरील सेवायोजनेबाबत मा. व्यवस्थापन परिषदेच्या ठरावाच्या अनुषंगाने मा. कुलगुरु महोदयांनी गठीत केलेल्या समितीने दि.२०/०७/२०२३ रोजी सादर केलेला अहवाल विचारार्थ.

</td><td>आस्थापना विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>

**मा. उपसचिव, महाराष्ट्र राज्य, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्या दि.१४/०६/२०२३ रोजीच्या पत्रास अनुसरुन श्री. रविंद्र महादेव कोरे यांच्या नियमित पदावरील समायोजनेबाबत मा. व्यवस्थापन परिषदेच्या ठरावाच्या अनुषंगाने मा. कुलगुरु महोदयांनी गठीत केलेल्या समितीने दि.२०/०७/२०२३ रोजी सादर केलेल्या अहवालातील शिफारशीनुसार शासनाच्या मान्यतेच्या अधिन राहून शासनाकडे अहवालाच्या अनुषंगाने समायोजनाचा प्रस्ताव पाठवून देण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.**

</td><td></td></tr>
</table>

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय:

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [७(१)] | शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत नियमित शिक्षकांचा कार्यभार वगळता, उर्वरित कार्यभाराकरिता आणि विद्यापीठाच्या सामान्य निधीतून कार्यरत संकुलातील सुरु असलेल्या अभ्यासक्रमांसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०३ नुसार स्थानिक निवड समितीमार्फत विविध विषयांतील एकूण १०३ तात्पुरती कंत्राटी सहायक प्राध्यापक पदे भरणेसंदर्भात मा. प्रभारी कुलगुरु महोदयांनी १२(७) मधील तरतुदीनुसार व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.<br>टिपणी: विद्यापीठात दरवर्षी नियमित शिक्षकांचा कार्यभार वगळता, उर्वरित शिल्लक कार्यभाराकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०३ नुसार माहे एकत्रित वेतनावर तात्पुरती कंत्राटी सहाय्यक प्राध्यापकांची पदे भरली जातात. त्यानुषंगाने विद्यापीठ परिसर सर्व संकुलांचा शै. वर्ष २०२३-२४ साठीचा विषयनिहाय कार्यभार या कार्यालयाचे पत्र क्र. पुअहोसोविसो/आस्था/शिक्षक/२०२३/३०५२, दि. १० मे, २०२३ अन्वये मागविण्यात आला होता.<br>त्यानुसार संबंधित संकुलांच्या संचालकांकडून कार्यभार प्राप्त झाला असून, सदर कार्यभारानुसार अनुदानित ०५ संकुलातील नियमित शिक्षकांचा कार्यभार वगळता, उर्वरित कार्यभारासाठी व इतर ०६ संकुलातील कार्यभाराकरिता पदांची समीक्षा करुन, पद निश्चितीकरिता मा.प्र-कुलगुरु व संबधित संकुलाचे संचालक/प्र.संचालक यांचे समवेत दि. २८/०६/२०२३ रोजी बैठकीचे आयोजन करण्यात आले. सदर बैठकीत अनुदानित, विनाअनुदानित, तसेच विद्यापीठाच्या सामान्य निधीतून कार्यरत असलेल्या संकुलातील कार्यभाराचा आढावा घेऊन, विविध विषयांतर्गत एकूण १०३ कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक पदे निश्चित करण्यात आली व प्रस्तुत कार्यालयाकडून दि.१३/०६/२०२३ रोजी सादर केलेल्या टिपणीच्या अनुषंगाने मा. प्रभारी कुलगुरु महोदयांनी उपरोक्त कार्यभाराची समीक्षा करुन व बैठकीचा आढावा विचारात घेऊन, विविध विषयांतर्गत एकूण १०३ कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक पदे भरण्यास मान्यता प्रदान केली आहे, त्याचा तपशील पुढीलप्रमाणे: | आस्थापना विभाग |

| अ. क्र. | संकुलाचे नाव | संकुलाकडील नियमित शिक्षकांचा कार्यभार वगळता शिल्लक कार्यभार | शिल्लक कार्यभारानुसार मागणी केलेली शिक्षकांची संख्या | आढाव्या अंती मंजूर करण्यात आलेली पदे |
|---|---|---|---|---|
| १ | पदार्थविज्ञान संकुल | ३२० | ०९ | ०९ |
| २ | रसायनशास्त्र संकुल | ४०० | १३ | १० |
| ३ | भूशास्त्र संकुल | २८८ | ०९ | ०८ |
| ४ | सामाजिकशास्त्रे संकुल | ६३२ | १६ | १५ |
| ५ | संगणकशास्त्र संकुल | ३६४ | १३ | ११ |
| ६ | वाणिज्य व व्यवस्थापन संकुल | ६१६ | १० | १० |
| ७ | भाषा व वाङ्मय संकुल | ३२० | १६ | १६ |
| ८ | तंत्रज्ञान संकुल | ५१४ | १६ | ०८ |
| ९ | आरोग्य विज्ञान संकुल | ११६ | ०३ | ०२ |
| १० | ललित कला व कला संकुल | ९६ | ०८ | ०८ |
| ११ | जैवशास्त्र संकुल | ९६० | १० | ०६ |
| | एकूण | ४६२६ | १२३ | १०३ |

| | | |
|---|---|---|
| | सबब, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत नियमित शिक्षकांचा कार्यभार वगळता, उर्वरित कार्यभाराकरिता आणि विद्यापीठाच्या सामान्य निधीतून कार्यरत संकुलातील सुरु असलेल्या अभ्यासक्रमांसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०३ नुसार स्थानिक निवड समितीमार्फत विविध विषयांतील एकूण १०३ तात्पुरती कंत्राटी सहायक प्राध्यापक पदे भरणेसंदर्भात, मा. प्रभारी कुलगुरु महोदयांनी १२(७) मधील तरतुदीनुसार व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव. | |
| ठराव: | शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत नियमित शिक्षकांचा कार्यभार वगळता, उर्वरित कार्यभाराकरिता आणि विद्यापीठाच्या सामान्य निधीतून कार्यरत संकुलातील सुरु असलेल्या अभ्यासक्रमांसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०३ नुसार स्थानिक निवड समितीमार्फत विविध विषयांतील एकूण १०३ तात्पुरती कंत्राटी सहायक प्राध्यापक पदे भरणेसंदर्भात मा. प्रभारी कुलगुरु महोदयांनी १२(७) मधील तरतुदीनुसार व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. | |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [७(२)] | **सोलापूर विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) यांनी संशोधन व सल्लागार समितीच्या (RAC) बैठकीस उपस्थित संशोधक मार्गदर्शकांना TA/DA मिळण्याबाबत केलेली विनंती विचारार्थ.** | संशोधन विभाग |
| | टिपणी: सोलापूर विद्यापीठ शिक्षक संघ, सोलापूर यांचेकडील दि. २०/०७/२०२३ रोजीचे प्राप्त निवेदनान्वये सोलापूर विद्यापीठ शिक्षक संघ, सोलापूर यांनी विद्यापीठ व महाविद्यालयीन संशोधन केंद्रास जोडलेल्या इतर महाविद्यालयातील संशोधन मार्गदर्शकांना संशोधन सल्लागार समिती बैठकीस उपस्थित राहण्यासाठी TA/DA दिला जात नाही. या संशोधक मार्गदर्शकांना संबंधित संशोधन केंद्राकडून संशोधन सल्लागार समिती बैठकीस उपस्थित राहण्यासाठी TA/DA मिळणे गरजेचे आहे असे नमुद करुन या संशोधक मार्गदर्शकांना संशोधन सल्लागार समिती बैठकीस उपस्थित राहण्यासाठी TA/DA मंजूर करणेबाबत संबंधीतांना आदेश व्हावेत अशी विनंती केली आहे. सदर पत्रावर मा. प्र-कुलगुरु महोदयांनी सदर निवेदन व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवण्याबाबत आदेश दिले आहेत.<br><br>याबाबत कार्यालयीन निवेदन असे की, प्रस्तुत विद्यापीठाने पेट-७ व पेट-८ करीता पात्र विद्यार्थ्यांना मार्गदर्शक वितरीत केले आहेत. तथापि, संशोधक मार्गदर्शकांच्या सोयीकरीता ज्या संशोधक मार्गदर्शकाचे महाविद्यालय हे संशोधन केंद्र नाही अशा संशोधक मार्गदर्शकांना प्रस्तुत विद्यापीठातील संकुले अथवा ज्या महाविद्यालयामध्ये संशोधन केंद्र आहे अशा संशोधन केंद्रांना जोडण्यात आले आहे. ज्या मार्गदर्शकांना त्यांचे महाविद्यालय संशोधन केंद्र नाही अशा संशोधक मार्गदर्शकांची अंदाजे संख्या १७० अशी आहे.<br><br>प्रस्तुत विद्यापीठात आजपर्यंत कोणत्याही संशोधक मार्गदर्शकांना संशोधक विद्यार्थ्यांच्या कार्याकरीता TA/DA देण्यात आलेला नाही. तसेच याबाबत विद्यापीठामध्ये कोणताही नियम नाही. सुटा संघटनेने RAC करीता उपस्थित उपरोक्त संशोधक मार्गदर्शकांना TA/DA मिळण्याबाबत विनंती केली आहे. RAC ची रचना व कार्ये सोबत जोडली आहेत.<br><br>सुटा संघटनेने केलेल्या विनंतीन्वये TA/DA द्यावयाचा झाल्यास प्रती संशोधक मार्गदर्शक अंदाजे रु.७००/- प्रमाणे रु.१,१९,०००/- इतकी रक्कम एका सहामाही करीता खर्ची पडणार आहे. RAC च्या वर्षातून किमान दोन बैठका असतात, त्यामुळे सदर खर्च वार्षिक रु.२,३८,०००/- इतकी रक्कम खर्च होणार आहे. यामध्ये ३०% संशोधक मार्गदर्शक हे प्रस्तुत विद्यापीठ संकुलामध्ये न येता महाविद्यालयातील संशोधन केंद्रामध्ये जात असल्याने सदर रक्कम महाविद्यालयामध्ये जमा होणाऱ्या पीएच.डी. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्कामधून अदा करावी लागणार आहे. त्यामुळे प्रस्तुत विद्यापीठ संकुलामध्ये येणाऱ्या संशोधक मार्गदर्शकांसाठी अंदाजे रु.१,७०,०००/- इतका खर्च विद्यापीठ अंदाजपत्रकामधून करावा लागणार आहे.<br><br>युजीसी नियमानुसार पीएच.डी. मार्गदर्शकांच्या नियुक्ती संदर्भातील कार्यपध्दती व निकष पुढील प्रमाणे आहेत.<br><br>दि. ०५ मे २०१६ Minimum Standards and Procedures for Award of Ph.D. Degrees Regulations, २०१६ नुसार | |

| | | |
|---|---|---|
| | 6. Allocation of Research Supervisor: Eligibility criteria to be a Research Supervisor, Co- Supervisor, Number of M.Phil./Ph.D. scholars permissible per Supervisor, etc.<br>6.1 Any regular Professor of the University/Institution Deemed to be a University/College with at least five research publications in refereed journals and any regular Associate/Assistant Professor of the university/institution deemed to be a university/college with a Ph.D. degree and at least two research publications in refereed journals may be recognized as Research Supervisor. Provided that in areas/disciplines where there is no or only a limited number of refereed journals, the Institution may relax the above condition for recognition of a person as Research Supervisor with reasons recorded in writing.<br>6.2 Only a full time regular teacher of the concerned University/Institution Deemed to be a University/College can act as a supervisor. The external supervisors are not allowed. However, CoSupervisor can be allowed in inter-disciplinary areas from other departments of the same institute or from other related institutions with the approval of the Research Advisory Committee.<br>०७ नोव्हेंबर, २०२२ रोजी प्रसिध्द केलेल्या Minimum Standards and Procedures for Award of Ph.D. Degrees Regulations, २०२२ नुसार<br>6. Allocation of Research Supervisor- Eligibility criteria to be a Research Supervisor, Co-Supervisor, Number of Ph.D. scholars permissible per supervisor, etc.<br>(1) Permanent faculty members working as Professor/Associate Professor of the Higher Educational Institution with a Ph.D., and at least five research publications in peer-reviewed or refereed journals and permanent faculty members working as Assistant Professors in Higher Educational Institutions with a Ph.D., and at least three research publications in peer-reviewed or refereed journals may be recognized as a Research Supervisor in the university where the faculty member is employed or in its affiliated Post-graduate Colleges/institutes. Such recognized research supervisors cannot supervise research scholars in other institutions, where they can only act as co-supervisors. Ph.D. awarded by a university under the supervision of a faculty member who is not an employee of the university or its affiliated Post- graduate Colleges/institutes would be in violation of these Regulations.<br>सबब, उपरोक्त बाब पाहता, सोलापूर विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) यांनी संशोधन व सल्लागार समितीच्या (RAC) बैठकीस उपस्थित संशोधक मार्गदर्शकांना TA/DA मिळण्याबाबत केलेली विनंती विचारार्थ. | |
| ठराव: | **संशोधन व सल्लागार समितीच्या (RAC) बैठकीस उपस्थित संशोधक मार्गदर्शकांना TA/DA, Auto Charges & Bus/Car fair हे Paper setting च्या नियमावलीनुसार देण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [७(३)] | **प्रस्तुत विद्यापीठातील शिपाई या पदावर कार्यरत महिला कर्मचारी यांच्या मागणीनुसार सध्या बाजारपेठेत गणवेश मध्ये ड्रेस व साडी दोन्ही उपलब्ध असल्यामुळे, ड्रेस आणि साडी दोन्ही प्रकार (महिला कर्मचारी यांच्या मागणीनुसार) खरेदी करण्यास व वापरण्यास परवानगी देण्याबाबतचा विनंती पत्र व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठात शिपाई या पदावर कार्यरत महिला कर्मचारी यांनी सध्या विद्यापीठाकडून पिवळ्या कलरची गणवेश (साडी) असून, आता सध्या बाजारपेठेत युनिफॉर्म मध्ये ड्रेस व साडी दोन्ही उपलब्ध असल्यामुळे कृपया ड्रेस आणि साडी दोन्ही प्रकार खरेदी करण्यास व वापरण्यास मान्यता मिळणेबाबत विनंती केले आहेत.<br>यापूर्वी व्यवस्थापन परिषदेच्या दि.०६/१२/२०१८ रोजीच्या बैठकीत ठराव क्र.(४०) अन्वये "प्रस्तुत विद्यापीठातील प्रयोगशाळा परिचर व ग्रंथालय परिचर या पदावर कार्यरत महिला व पुरुष कर्मचारी तसेच शिपाई या पदावर कार्यरत महिला कर्मचारी यांच्या मागणीनुसार गणवेशाचा रंग ठरविण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीने शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली." असा निर्णय झाल्याने, सदर निर्णयानुसार महिला शिपाई कर्मचारी यांना पांढऱ्या रंगाऐवजी पिवळ्या रंगाची साडी गणवेश म्हणून लागू राहील असे दि.०२/०२/२०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये कळविण्यात आले आहे. सद्य:स्थितीत शिपाई या पदावर कार्यरत असलेल्या महिला कर्मचारी यांना दरवर्षी पिवळ्या रंगाची साडी गणवेश म्हणून देण्यात येत आहे.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठातील शिपाई या पदावर कार्यरत महिला कर्मचारी यांच्या मागणीनुसार सध्या बाजारपेठेत गणवेश मध्ये ड्रेस व साडी दोन्ही उपलब्ध असल्यामुळे, ड्रेस आणि साडी दोन्ही प्रकार (महिला कर्मचारी यांच्या मागणीनुसार) खरेदी करण्यास व वापरण्यास परवानगी देण्याबाबतचा विनंती पत्र व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठातील शिपाई या पदावर कार्यरत महिला कर्मचारी यांच्या विनंतीनुसार ड्रेस आणि साडी हे दोन्ही गणवेश प्रकार खरेदी करण्यास व वापरण्यास परवानगी देण्याची बाब स्विकारुन त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [७(४)] | **M. V. A. पेंटीग अभ्यासक्रमाची किमान प्रवेश पात्रतेची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठामध्ये ललित संकुल शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून सुरु करण्यात आले. या संकुलांतर्गत गायन, तबला, नाट्यशास्त्र व पेटींग हे अभ्यासक्रम सुरु आहेत. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून सदर संकुलामध्ये मास्टर ऑफ व्हीजवल आर्ट एम. व्ही. ए (पेंटीग) हा कोर्स सुरु करण्यात आला आहे.<br>या अभ्यासक्रमाकरिता किमान पात्रता कोणत्याही शाखेचा पदवीधर असल्याने इच्छुक विद्यार्थ्यांला पेटींग मधील मूलभूत ज्ञान नसल्यामुळे एम MVA (पेटींग) त्याचे उच्च शिक्षण घेणे समस्या उदभवत आहेत.<br>त्यामुळे एम. व्ही. ए पेटींग या विषयाकरिता किमान शैक्षणिक पात्रता बॅचलर ऑफ विजवल आर्ट आणि बॅचलर ऑफ फॉईन आर्ट ठेवणे उचित होणार आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यानी G.D. Art (Government Diploma in Art) हा अभ्यासक्रम पूर्ण केला आहे असा विद्यार्थ्यांना मास्टर ऑफ विजवल आर्ट मध्ये पेंटीग या वर्गात प्रवेश घेण्यासाठी ०१ वर्ष कालावधीचा ब्रिज कोर्स इन व्हीजवल आर्ट पेंटीग हा अभ्यासक्रम सुरु करणे सोईचे होणार आहे.<br>सोलापूर परिसर तसेच सांगली, सातारा, कोल्हापूर, लातूर, धाराशिव या भागातून अनेक विद्यार्थ्यांना एम. व्ही. ए पेंटीग हा अभ्यासक्रमांच्या प्रवेशाची इच्छा दर्शविली आहे. या भागातील बहुतांश विद्यार्थी G.D. Art झाल्याने त्यांना एम. व्ही. ए पेटींगकरिता ०१ वर्ष कालावधीचा ब्रिज कोर्स उपलब्ध करुन दिला व त्यांनी सदर कोर्स पूर्ण केल्यास पात्र विद्यार्थ्यांना MVA पेंटीग अभ्यासक्रमास प्रवेश देणे संयुक्तीक होणार आहे. सदर ०१ वर्ष कालावधीचा ब्रिजकोर्स (Bridge Course in Visual Art Painting) सुरु करण्यास दिनांक १२/०७/२०२३ च्या टिपणीन्वये मा. कुलगुरु महोदयानी सदरचा विषय अभ्यासमंडळे/विद्यापरिषद/व्यवस्थापन परिषद या मंडळामध्ये ठेवून सुरु करण्याच्या शेऱ्यानुसार मान्यता दिली आहे. त्या अनुषंगाने सदरचा विषय अधिष्ठाता मंडळ /विद्यापरिषद /व्यवस्थापन परिषदेमध्ये ठेवण्यास आदेशित केले आहे.<br>उपरोक्त नमूद केलेल्या माहितीन्वये ललित कला व कला संकुल येथे एम व्ही. ए पेटींग या विषयाच्या प्रवेशाकरिता किमान पात्रता बॅचलर ऑफ विजवल आर्ट व फॉईन आर्ट हे ठेवण्यास ज्या विद्यार्थ्याचे G.D. Art अभ्यासक्रम प्रवेश केला आहे त्या विद्यार्थ्याकरिता ०१ वर्ष कालावधीचा ब्रिज कोर्स ईन विजवल आर्ट पेंटीग सुरु करण्याची बाब विद्यापरिषदेच्या विचारार्थ ठेवली असता सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्यात आली.<br>सबब, सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | ललित कला व कला संकुल |
| ठराव: | **ललित कला व कला संकुल येथे एम.व्ही.ए. पेटींग या विषयाच्या प्रवेशाकरिता किमान पात्रता बॅचलर ऑफ विजवल आर्ट व फॉईन आर्ट हे ठेवण्यास व ज्या विद्यार्थ्याचे G.D. Art अभ्यासक्रम प्रवेश केला आहे त्या विद्यार्थ्याकरिता ०१ वर्ष कालावधीचा ब्रिज कोर्स ईन विजवल आर्ट पेंटीग सुरु करण्यास दि.२४/०७/२०२३ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत ठराव क्र.२१(६) अन्वये केलेली शिफारस स्विकारुन त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [७(५)] | मे. सिंग कमांडो सिक्युरिटी फोर्स प्रा. लि. नागपूर या खासगी कंत्राटदारामार्फत प्रस्तुत विद्यापीठामध्ये कार्यरत असलेल्या कंत्राटी मनुष्यबळाच्या वेतनापोटी व मे. अभिजित इंटेलिजन्स सिक्युरिटी फोर्स प्रा. लि., नागपूर या खासगी कंत्राटदारामार्फत प्रस्तुत विद्यापीठामध्ये कार्यरत असलेल्या कंत्राटी सुरक्षा रक्षक यांच्या वेतनापोटी माहे जून, २०२३ मध्ये आदा करण्यात आलेल्या वेतन देयकाची माहिती माहितीस्तव. | आस्थापना विभाग |

टिपणी: प्रस्तुत विद्यापीठामध्ये मे. सिंग कमांडो सिक्युरिटी फोर्स प्रा. लि. नागपूर या खासगी कंत्राटदारामार्फत विविध पदनामाचे कंत्राटी मनुष्यबळ विद्यापीठामधील विविध विभाग/संकूल यांच्या मागणीनुसार प्रशासकीय कार्यवाही करुन घेण्यात येतात. त्यानुसार सद्यस्थितीत विद्यापीठामध्ये मे. सिंग कमांडो सिक्युरिटी फोर्स प्रा. लि. नागपूर यांच्यामार्फत कार्यरत असलेल्या कंत्राटी मनुष्यबळाच्या वेतनापोटी माहे जून, २०२३ मध्ये आदा करण्यात आलेल्या वेतनासंदर्भातील माहिती खालीलप्रमाणे आहे.

अ) <u>एकत्रित वेतन कार्यरत विभाग</u>: कुलसचिव कार्यालय, शास्त्रीय उपकरण केंद्र, ज्ञानस्त्रोत केंद्र, सभा व निवडणूका विभाग, शैक्षणिक, संशोधन आणि विकास विभाग, ललितकला व कला संकूल, परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभाग व मास कम्युनिकेशन विभाग (सामाजिकशास्त्रे संकूल).

| अ. क्र. | पदनाम | कर्मचाऱ्यांची संख्या | हजर दिवस | एकूण वेतन |
|---|---|---|---|---|
| १. | इन्स्ट्रुमेंट एक्सपर्ट (एकत्रित वेतन रु.३०,०००/-) | ०१ | ३० | १,९०,८९०/- |
| २. | जनसंपर्क अधिकारी (एकत्रित वेतन रु.२५,०००/-) | ०१ | ३० | |
| ३. | संगणक तज्ञ (एकत्रित वेतन रु.२०,०००/-) | ०१ | ३० | |
| ४. | प्रोडयुसर (एकत्रित वेतन रु.१५०००/-) | ०१ | ३० | |
| ५. | वेब डेव्हलपर (एकत्रित वेतन रु.२०,०००/-) | ०१ | ३० | |
| ६. | संगणक लेखनिक (एकत्रित वेतन रु.१८०००/-) | ०३ | ९० | |

ब) <u>कुशल व अर्धकुशल संवर्ग कार्यरत विभाग</u>: अभियांत्रिकी विभाग, कायदा विभाग, नॅक विभाग, ज्ञानस्त्रोत केंद्र, कुलसचिव कार्यालय, वित्त विभाग, शैक्षणिक, संशोधन आणि विकास विभाग, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, विद्यार्थी विकास विभाग, आस्थापना विभाग, आरोग्य केंद्र, सामाजिकशास्त्रे संकूल व सर्व शैक्षणिक संकूले.

| अ. क्र. | पदनाम | कर्मचाऱ्यांची संख्या | हजर दिवस | एकूण वेतन |
|---|---|---|---|---|
| १. | टेक्निशियन (व्हिडीओ एडीटर) (प्रतिदिन रु. ६४१.३८) | ०१ | २३ | ८,९६,७२४.५३/- |
| २. | प्रयोगशाळा सहाय्यक (प्रतिदिन रु.६४१.३८) | ०४ | ८३ | |
| ३. | कनिष्ठ अभियंता (प्रतिदिन रु.६४१.३८) | ०१ | २९ | |
| ४. | कृषी सहाय्यक (प्रतिदिन रु. ६४१.३८) | ०१ | २६ | |
| ५. | ग्रंथालय सहाय्यक (प्रतिदिन रु. ६४१.३८) | ०१ | २६ | |
| ६. | संगणक लेखनिक (प्रतिदिन रु.६४१.३८) | ३६ | ७९९ | |
| ७. | वाहनचालक (प्रतिदिन रु.६४१.३८) | ०८ | १९६ | |
| ८. | संगणक लेखनिक अर्धकुशल (प्रतिदिन रु. ६११.५४/-) | ०१ | २० | |

क) <u>अकुशल संवर्ग कार्यरत विभाग</u>: शैक्षणिक संकुले, कुलसचिव कार्यालय, वित्त विभाग, शैक्षणिक, संशोधन व विकास विभाग, ज्ञानस्रोत केंद्र, कौशल्य विकास केंद्र, विद्यार्थी विकास विभाग, आस्थापना विभाग, सभा व निवडणूक, आरोग्य केंद्र व अभियांत्रिकी विभाग.

| अ. क्र. | पदनाम | कर्मचाऱ्यांची संख्या | हजर दिवस | एकूण वेतन |
|---|---|---|---|---|
| १. | संगणक लेखनिक (प्रतिदिन रु. ५७९.४२/-) | ०१ | १२ | १०,२१,९८२.२६/- |
| २. | प्रयोगशाळा परिचर (प्रतिदिन रु. ५७९.४२/-) | ०४ | ८६ | |
| ३. | शिपाई (प्रतिदिन रु. ५७९.४२/-) | ३१ | ६९३ | |
| ४. | माळी (प्रतिदिन रु. ५७९.४२/-) | २१ | ५१६ | |
| ५. | स्वच्छक (प्रतिदिन रु. ५७९.४२/-) | ०९ | २०८ | |

ड) <u>कुशल व अकुशल संवर्ग कार्यरत विभाग</u>: परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभाग.

| अ. क्र. | पदनाम | कर्मचाऱ्यांची संख्या | हजर दिवस | एकूण वेतन |
|---|---|---|---|---|
| १. | संगणक लेखनिक (प्रतिदिन रु. ६४१.३८) | १७ | ४०२ | ४,०६,०४३/- |
| २. | संगणक लेखनिक अकुशल (प्रतिदिन रु. ५७९.४२/-) | १ | २५ | |
| ३. | शिपाई (प्रतिदिन रु. ५७९.४२/-) | ०५ | १३२ | |

| | |
|---|---|
| अ) + ब) + क) + ड) = २५,१५,६३९.७९/- + सीजीएसटी व एसजीएसटी = ४,५२,८१५.१६/- = एकूण देयक | २९,६८,४५५/- |

उपरोक्त तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे एकूण वेतन, त्यावर पी.एफ., ई.एस.आय., जी.एस.टी. व सेवाशुल्क असे एकूण रक्कम रु.२९,६८,४५५/- (अक्षरी रुपये एकोणतीस लाख अडूसष्ट हजार चारशे पंच्चावण फक्त) चे वेतन देयक प्रशासकीय मान्यता घेऊन वित्त व लेखा विभागाकडून आदा करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

तसेच प्रस्तुत विद्यापीठामध्ये मे. अभिजित इंटेलिजन्स सिक्युरिटी फोर्स प्रा. लि. नागपूर या कंत्राटदारामार्फत कंत्राटी सुरक्षा रक्षक विद्यापीठामधील सुरक्षा विभाग यांच्या मागणीनुसार प्रशासकीय कार्यवाही करुन घेण्यात येतात. त्यानुसार सद्यस्थितीत विद्यापीठामध्ये मे. अभिजित इंटेलिजन्स सिक्युरिटी फोर्स प्रा. लि. नागपूर यांच्यामार्फत कार्यरत असलेल्या कंत्राटी सुरक्षा रक्षकांच्या वेतनापोटी माहे जून, २०२३ मध्ये आदा करण्यात आलेल्या वेतनासंदर्भातील माहिती खालीलप्रमाणे आहे.

अ) <u>अर्धकुशल संवर्ग कार्यरत विभाग</u>: विद्यापीठ, ४८२ एकर परिसर व अभ्यास केंद्र (रंगभवन).

| अ. क्र. | पदनाम | कर्मचाऱ्यांची संख्या | हजर दिवस | एकूण वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | सुरक्षा रक्षक (प्रतिदिन रु.६११.५४/-) | ३७ | ८४६ | ७,१०,६९१/- |

ब) <u>अर्धकुशल संवर्ग कार्यरत विभाग</u>: परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभाग.

| अ. क्र. | पदनाम | कर्मचाऱ्यांची संख्या | हजर दिवस | एकूण वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | सुरक्षा रक्षक (प्रतिदिन रु.६११.५४/-) | ०३ | ७६ | ६३,८४५/- |

| | | |
|---|---|---|
| | उपरोक्त तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे एकूण वेतन, त्यावर पी.एफ., ई.एस.आय., जी.एस.टी. व सेवाशुल्क असे एकूण रक्कम रु.७,७४,५३६/- (अक्षरी रुपये सात लाख चौऱ्याहत्तर हजार पाचशे छत्तीस फक्त) चे वेतन देयक प्रशासकीय मान्यता घेऊन वित्त व लेखा विभागाकडून आदा करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.<br>सबब, मे. सिंग कमांडो सिक्युरिटी फोर्स प्रा. लि. नागपूर या खासगी कंत्राटदारामार्फत प्रस्तुत विद्यापीठामध्ये कार्यरत असलेल्या कंत्राटी मनुष्यबळाच्या वेतनापोटी व मे. अभिजित इंटेलिजन्स सिक्युरिटी फोर्स प्रा. लि. नागपूर या खासगी कंत्राटदारामार्फत प्रस्तुत विद्यापीठामध्ये कार्यरत असलेल्या कंत्राटी सुरक्षा रक्षक यांच्या वेतनापोटी माहे जून, २०२३ मध्ये संबंधित कंत्राटदारास उपरोक्तप्रमाणे नमूद केल्यानुसार आदा करण्यात आलेल्या वेतन देयकाची माहिती व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव. | |
| ठराव: | मे. सिंग कमांडो सिक्युरिटी फोर्स प्रा. लि. नागपूर या खासगी कंत्राटदारामार्फत प्रस्तुत विद्यापीठामध्ये कार्यरत असलेल्या कंत्राटी मनुष्यबळाच्या वेतनापोटी व मे. अभिजित इंटेलिजन्स सिक्युरिटी फोर्स प्रा. लि., नागपूर या खासगी कंत्राटदारामार्फत प्रस्तुत विद्यापीठामध्ये कार्यरत असलेल्या कंत्राटी सुरक्षा रक्षक यांच्या वेतनापोटी माहे जून, २०२३ मध्ये आदा करण्यात आलेल्या वेतन देयकाची नोंद घेण्यात आली.<br>तसेच संबंधित कंत्राटदारामार्फत कार्यरत असलेल्या कंत्राटी मनुष्यबळ व कंत्राटी सुरक्षा रक्षक यांचा आढावा व इतर अनुषंगिक माहिती घेण्यासाठी सर्वानुमते खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली. | |

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | अध्यक्ष |
| २) | श्री. महादेव दऱ्याप्पा कमळे | सदस्य |
| ३) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य |
| ४) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य |
| ५) | सीए श्रेणिक हुकुमचंद शाह, वित्त व लेखा अधिकारी | सदस्य सचिव |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [७(६)] | **प्रस्तुत विद्यापीठ व श्री नेमीनाथ जैन ब्रम्हचार्याश्रम, नाशिक या संस्थेसोबत कौशल्य विकास केंद्र यांच्या दरम्यान विविध कौशल्याधारित अभ्यासक्रमांसाठीचा सामंजस्य करार करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाच्या कौशल्य विकास केंद्र मार्फत चालणाऱ्या विविध कौशल्याधारित अभ्यासक्रमांसाठी व त्या अनुषंगाने अभ्यासक्रम सुरु करण्याकरिता श्री नेमीनाथ जैन ब्रम्हचार्याश्रम, नाशिक या संस्थेचा प्रस्ताव विद्यापीठास प्राप्त झालेला आहे. त्या अनुषंगाने सदर संस्थेसोबत प्रथमत: जनरल टर्मस् नुसार सामंजस्य करार करणे आवश्यक आहे. सदर करारानंतर कौशल्याधारित अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने स्वतत्र करार करावयाचा आहे. सामंजस्य कराराचा विषय दि.२४/०७/२०२३ रोजी संपन्न झालेल्या विद्यापरिषदेने सदर बैठकीत विषय क्र.२१(७) अन्वये सामंजस्य करारास मान्यता देण्याची व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठ व श्री नेमीनाथ जैन ब्रम्हचार्याश्रम, नाशिक या संस्थेसोबत कौशल्य विकास केंद्र यांच्या दरम्यान विविध कौशल्याधारित अभ्यासक्रमांसाठीचा सामंजस्य करार करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ. | कौशल्य विकास केंद्र |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठ व श्री नेमीनाथ जैन ब्रम्हचार्याश्रम, नाशिक या संस्थेसोबत कौशल्य विकास केंद्र यांच्या दरम्यान विविध कौशल्याधारित अभ्यासक्रमांसाठीचा सामंजस्य करार करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारुन सामंजस्य करार करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[७(७)]</td><td>

**श्री. संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती पडताळणी समिती अहवाल विचारार्थ**

टिपणी: श्री. युवराज गंगाराम कलबर्मे यांनी श्री. संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. बी. पवार यांनी सन २०१३ ते २०२३ या काळात मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती वाटपात गैरप्रकार केला आहे, असा आरोप केला असून सदर कालावधीतील शिष्यवृत्ती संदर्भातील अभिलेखांची पडताळणी करुन संबंधित दोषी प्राचार्यावर कार्यवाही करावी, अशी विनंती केली होती. त्यानुसार अनुसरुन सदर महाविद्यालयाचे सन २०१३ ते २०२३ या वर्षाचे शिष्यवृत्ती संदर्भातील अभिलेखांची पडताळणी करुन अहवाल दि.०८/०५/२०२३ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत विद्यापीठाकडे सादर करण्याविषयी कार्यालयीन आदेश देण्यात आले होते. त्यानुसार श्री. संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयास भेटी देऊन शिष्यवृत्ती संदर्भात पडताळणी केल्याचे अहवाल प्राप्त झाले आहे, ते खालीलप्रमाणे-

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>शिष्यवृत्ती पडताळणी समिती अहवाल</th></tr>
<tr><td>१.</td><td>मागासवर्गीय शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती ऑनलाईन जमा होते.</td></tr>
<tr><td>२.</td><td>महाविद्यालयात स्थायी समिती अस्तित्वात आहे.</td></tr>
<tr><td>३.</td><td>शिष्यवृत्ती फॉर्म भरण्यासाठी कोणतीही स्वतंत्र व्यवस्था नाही.</td></tr>
<tr><td>४.</td><td>समाजकल्याण विभाग व विद्यापीठाची शिष्यवृत्तीबाबत माहिती देण्याची कोणतीही स्वतंत्र व्यवस्था नाही.</td></tr>
<tr><td>५.</td><td>तक्रारीत नमूद केलेला तक्रारी संदर्भात असे दिसून आले आहे की, समाज कल्याण विभागाच्या विशेष चौकशी पथकाने दि.२८/०१/२०१८ रोजी महाविद्यालयाकडे रु.२६,०६,३१३/- इतकी रक्कम वसुली पात्र असल्याचे कळविले होते. महाविद्यालयाने दि.१३/०८/२१९ रोजी समाज कल्याण विभागास भरणा केल्याचे कळविले आहे. रक्कम थकित ठेवणे व भरणे ही बाब महाविद्यालय व समाजकल्याण यांची अंतर्गत बाब आहे. या विषयी तक्रारदाराने समाजकल्याण विभागास संपर्क साधणे असे योग्य वाटते.</td></tr>
<tr><td>६.</td><td>समितीला समाज कल्याणची रक्कम थकित का ठेवली होती याबाबत काही कल्पना नाही.</td></tr>
</table>

सबब, श्री. संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती पडताळणी समिती अहवाल विचारार्थ.

</td><td>विशेष कक्ष विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>

**श्री. संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती पडताळणी समितीचा अहवाल सर्वानुमते स्विकारुन, त्यास समाजकल्याण विभागास पाठविण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.**

</td><td></td></tr>
</table>

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [७(८)] | **अधिसभा सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांवर कार्यालयाने तयार केलेली उत्तरे अधिसभेच्या बैठकीत देण्याकरिता अंतिम करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: अधिसभा सदस्यांनी अधिसभेच्या बैठकीकरिता प्रश्न पाठविलेले आहेत. सदर प्रश्नांची उत्तरे कार्यालयाने तयार केलेली आहेत. २०१९ चा एकरुप परिनियम क्रमांक ४ मधील नियम क्र. ६ (१३) नुसार, व्यवस्थापन परिषद अधिसभेच्या बैठकीत त्यांना द्यावयाची उत्तरे तयार करील.<br>सबब, अधिसभेच्या सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची कार्यालयाने तयार केलेली उत्तरे विचारार्थ. | **सभा व निवडणूका विभाग** |
| ठराव | **अधिसभा सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांवर कार्यालयाने तयार केलेली उत्तरे खालील दुरुस्तीसह सर्वानुमते अंतिम करण्यात आली.**<br>**१. अधिसभा सदस्यांकडून मूळ प्रश्नांस जोडून उपप्रश्न विचारण्यात आला असल्यास तो वगळण्यात यावा.**<br>**२. अधिसभा सदस्यांकडून मूळ प्रश्नानंतर अजून प्रश्न विचारला असल्यास अथवा मूळ प्रश्नानंतर “व” ने विचारलेला प्रश्न असे असेल तर त्यांस स्वतंत्र समजण्यात यावे व त्यास त्यानंतरचा क्रम देऊन ३ पेक्षा जास्त प्रश्न होत असल्यास परिनियमानुसार उर्वरीत प्रश्न वगळण्यात यावेत.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [७(९)] | दि.०१ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या वर्धापन दिनी प्रदान करण्यात येणाऱ्या विविध पुरस्काराबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अन्वये कलम १२(७) अन्वये मा. प्रभारी कुलगुरुमहोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव. | कुलसचिव कार्यालय |
| ठराव: | दि.०१ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या वर्धापन दिनी प्रदान करण्यात येणाऱ्या विविध पुरस्काराबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा. प्रभारी कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.<br>तसेच पुरस्काराबाबतची नियमावली सुधारित करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली. | |

| | | |
|---|---|---|
| १) | प्राचार्य डॉ. भिमाशंकर मुर्गप्पा भांजे | अध्यक्ष |
| २) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य |
| ३) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य |
| ४) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य |
| ५) | योगिनी घारे | सदस्य सचिव |

श्री. सचिन मारुती गायकवाड यांनी खालीलप्रमाणे विषय सादर केला.

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [७(१०)] | प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद बैठक क्रमांक १५७, १५८, १५९ या झालेल्या बैठकीतील मंजूर ठराव व विषय याबाबतचा कार्यपूर्ती अहवाल ठेवण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बैठक झाल्यानंतर पुढील बैठकीत मंजूर ठराव व त्यावर झालेला कार्यपूर्ती अहवाल हा विषय क्र. २ अन्वये ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. | |

सौ. पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील यांनी खालीलप्रमाणे विषय सादर केला.

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[७(११)]</td><td>प्रस्तुत विद्यापीठाच्या नवीन प्रशासकीय इमारत तसेच खेलो इंडियाच्या मल्टीपर्पज हॉलची मागील चार महिन्यातील कामाची स्थिती, आजपर्यंत झालेला खर्च अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या समोर सादर करण्याची बाब विचारार्थ.</td><td rowspan="2">अभियांत्रिकी विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>मा. कुलगुरु महोदयांनी प्रशासकीय भवन तसेच खेलो इंडिया अंतर्गत मल्टीपर्पज हॉलची पाहणी केल्यानंतर सदर बाबत सविस्तर अभ्यास करुन अहवाल देणेसाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.<br>
<table>
<tr><td>१)</td><td>श्री. सुधाकर तुकाराम सरवदे</td><td>अध्यक्ष</td></tr>
<tr><td>२)</td><td>प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>३)</td><td>श्री. गिरीष अनंत कुलकर्णी, विद्यापीठ अभियंता</td><td>सदस्य सचिव</td></tr>
</table>
सदर समितीने आपला अहवाल पुढील व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत सादर करावा असे ठरले.</td></tr>
</table>

डॉ. सुशिल कुमार शिंदे यांनी खालीलप्रमाणे विषय सादर केला.

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [७(१२)] | विद्यापीठातील वर्ग १ ते ४ या संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी पदनिहाय कामाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या निश्चित करण्याची बाब विचारार्थ | आस्थापना विभाग |
| ठराव: | विद्यापीठातील वर्ग १ ते ४ या संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी पदनिहाय कामाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या ह्या दि.१४/०६/२०११ रोजीच्या परिपत्रकान्वये निश्चित करण्यात आल्या असल्याने त्या विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात याव्यात असे सर्वानुमते ठरले. | |

मा. प्रभारी कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

17.8.23
अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद